# उन्हाळ्यात करा वेलवर्गीय भाजीपाला

प्रविण मांजरे
आचार्य पदवी विद्यार्थी

डॉ. मोहन पाटील
सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषि महाविद्यालय, धाराशिव

थंडी कमी होऊन उन्हाळ्याची चाहूल लागताच जमीन तयार करून उन्हाळी हंगामात भाजीपाल्याचे नियोजन केल्यास शेतकऱ्यांना मागील नुकसानीची कसर भरून काढता येईल. यावर्षी बऱ्याच भागात असमतोल असा पाऊस पडल्यामुळे बऱ्याच भागात उत्पन्न कमी मिळाले. जर आपल्याकडे उन्हाळ्यात पुरेल असे पाणी असेल आणि ठिबक सिंचनाची सुविधा असेल तर वेलवर्गीय भाजीपाला पिके निवडून उत्पन्नात भर टाकता येईल. वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये काकडी, कारले, दुधी भोपळा, दोडका, पडवळ, तांबडा भोपळा, खरबूज, कलिंगड अशा भाजीपाला पिकांचा समावेश होतो. या पिकांना आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे.

कलिंगड हे फळ शरीराला थंडावा देणारे आहे. त्यामुळे ती फळे आरोग्याला पोषक असतात. भोपळा तिखट व उष्ण असून संधिवात, दातांचे रोग इत्यादींवर गुणकारी आहे. तसेच मधुर, शीतल, तर्पणकारक, गुरू, रूचिकर, पौष्टिक, धातुवर्धक बलप्रद, पित्तनाशक आहे. शरीराच्या वाढीस, पोषणास व आरोग्य रक्षणासाठी आवश्यक असलेली खनिजद्रव्ये, प्रोटिन्स, फॉस्फरस, कॅल्शियम, अ, ब, क इत्यादी जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. या वेलवर्गीय फळभाजीचा उपयोग मधुमेहाचा विकार असणाऱ्या व्यक्तींनी आहारामध्ये आठवड्यातून एकदा किंवा दोनदा केल्यास साखरेचे प्रमाण कमी होऊन मधुमेह आटोक्यात येतो. उन्हाळ्यात या पिकांना बाजारात मागणी देखील जास्त असते.

### हवामान:

वेलवर्गीय भाजीपाला पिकांना उष्ण व कोरडे हवामान मानवते. थंड हवामानात या पिकांची वाढ होत नाही. पिकांच्या योग्य वाढीसाठी २४ ते ३० अंश से. तापमान अनुकूल असते. तसेच तापमान १८ अंश. से. च्या खाली गेल्यास काही पिकांच्या बियांची उगवण होत नाही. तसेच तापमान ३२ अंश. से. च्या वर गेल्यास पिकांची वाढ खुंटते.

### जमीन:

वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी जमीन हाअत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हलक्या जमिनीत पीक घेतल्यास अपेक्षित उत्पादन मिळत नाही. म्हणून भरपूर उत्पादन मिळण्यासाठी पोयटायुक्त गाळाची, पाण्याचा उत्तम निचरा होणारी व सेंद्रिय पदार्थ असणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ५.५ ते ७.० पर्यंत असावा.

### लागवड:

उन्हाळ्यात वेलवर्गीय भाजीपाला लागवड जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात करतात.

### उन्हाळी पूर्वमशागत व लागवड:

जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात या पिकांची लागवड केली जाते. पूर्वमशागत व लागवड करताना शेतास उभी आडवी नांगरट करून ढेकळे फोडून काढावीत. नंतर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ३० ते ३५ गाड्या टाकावे व नंतर वखराची पाळी द्यावी. प्रत्येक खड्यात ३ ते ५ किलो शेणखत टाकून मातीत मिसळावे. नंतर प्रत्येक आळ्यात ३ ते ४ बिया टोकाव्या.

### लागवड पध्दती:

आळे पध्दत व सरी पध्दतीने वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करता येते.

### बीजप्रक्रिया:

वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करण्यापूर्वी बियाण्यास बीजप्रक्रिया करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे अनेक बुरशीजन्य रोग नियंत्रणात आणणे सोपे होते. त्यासाठी कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम २ ते ५ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे या प्रमाणात बियाण्यास चोळावे व त्यानंतर बियाण्याची लागवड करावी.

### वेलींना आधार देणे:

वेलवर्गीय भाज्यांच्या लागवडीसाठी मंडप, ताटी पध्दतीचा अवलंब करावा. दोडका,काकडी, कारले तसेचदुधी भोपळ्याचे बियाणे लावल्यानंतर १५ ते २० दिवसांनी वेलींना बांबूचा मंडप तयार करून आधार द्यावा. मंडप तयार झाल्यानंतर आठ फूट उंचीची सुतळी घेऊन त्याचे एक टोक वेलाच्या खोडाजवळ तिरपी काडी रोवून त्या काडीने बांधावे. त्या सुतळीस पीळ देऊन दुसरे टोक वेलावरील तारेस बांधावे. वेल सुतळीच्या सहाय्याने वाढत असताना बगलफूट व ताणवे काढावेत, पाने काढू नयेत.



मांडव पद्धतीने काकडी आणि कारली लागवड

मुख्य वेल मंडपावर पोचल्यानंतर त्याचा शेंडा खुडावा व राखलेल्या बगलफुटी वाढू द्याव्यात. वेलाची उंची पाच फूट झाल्यावर वेलाची बगलफूट व ताणवे काढणे

थांबवावे. मंडपासाठी लागणारे साहित्य तीन ते चार हंगामांसाठी वापरता येते. कलिंगड व खरबूज या पिकांची गादी वाफ्यावर लागवड करावी, त्यामुळे लागवड रूंद गादीवाफ्याच्या दोन्ही बाजूंना करता येते. तसेच गादी वाफ्यावर वेल पसरतो व फळे पाण्याच्या संपर्कात न येता खराब होत नाहीत.

### सुधारित वाणांचा वापर:

- दोडका - कोईमतूर-१, पुसा नसदार, कोकण हरिता, फुले सुचेता इत्यादी.
- कारली - फुले प्रियांका, फुले ग्रीन गोल्ड, को-लाँग व्हाईट, कोकण तारा, कोईमतुर लाँग, अर्का हरित, हिरकणी.
- दुधी भोपळा - सम्राट, पुसा नवीन, पुसा समर, पोलिफिकलॉंग, पंजाब कोमल, पुसा मांजरी, पुसा मेघदूत, अर्का बहार, नडगी, स्थानिक.
- काकडी - शीतल, हिमांगी, फुले शुभांगी, फुले प्राची, पूना खीरा इत्यादी.
- खरबूज – पुसा सरबती, हरा मधु, दुर्गापुरा सिलेक्शन, पंजाब सुनहरी इत्यादी.
- कलिंगड - असाही यामाटो, शुगर बेबी, अर्का माणिक, अर्का ज्योती, मधुमिलन, नाथ १०१ इत्यादी.
- पडवळ - कोईमतूर-१, फुले वैभव, कोकण श्वेता इत्यादी.
- तांबडा भोपळा - अर्का चंदन, अर्का सूर्यमुखी को- १, सीएम-१४, पुसा विश्वास इत्यादी.
- घोसाळी - पुसा चिकणी, कोकण घोसाळी, एनएसजीएच-१० (खरीप हंगामासाठी)

यासोबतच अधिक उत्पन्न देणाऱ्या काही खाजगी कंपन्याचे सुधारित वाण देखील बाजारात उपलब्ध आहेत. वरील प्रमाणे वाणाची निवड केल्यास उत्पन्न चांगले मिळते.

### वेलवर्गीय भाज्यांसाठी खतांचे नियोजन (मात्रा प्रति हेक्टरी):

सर्वच वेलवर्गीय भाजीपाला पिकांना लागवडीपूर्वी हेक्टरी १५ टन शेणखत टाकावे. विद्यापीठाच्या शिफारसीनुसार काकडी ला १३५:६०:३०, कारली १२०:६०:३० तर दुधी भोपळा, दोडका, कलिंगड, खरबूज आणि घोसाळी या पिकांना १००:५०:५० किलो नत्र, स्फुरद, पालाश हि खते द्यावे. खते देताना लागवडीच्या वेळी पुर्ण स्फुरद, पालाश व नत्र अर्धे द्यावे. उर्वरित नत्र खुरपणी नंतर (साधारणपणे २५-३० दिवसांनी) द्यावे.

### पाणी व्यवस्थापन:

या पिकांना उन्हाळी हंगामात चार ते पाच दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. जमीन हलकी असल्यास व तापमानात वाढ झाल्यास दोन पाण्याच्या पाळ्यांमधील अंतर कमी करावे तसेच फूल अवस्थेत व फळवाढीच्या अवस्थेमध्ये पाणी व्यवस्थित द्यावे. सदर अवस्थेत पाणी कमी दिल्यास उत्पादनावर परिणाम होतो. पाण्याची बचत करण्यासाठी सुधारित ठिबक सिंचनाचा वापर करावा.

### काढणी:

काकडी, पडवळ, कारली, दोडका, घोसाळी व दुधी भोपळा या पिकांची फळे कोवळी असताना काढणी करावी. जास्त पक्व होऊ देऊ नये. फळधारणेपासून ५-६ दिवसांत फळे काढणीस तयार होतात. काढणी देठासह करावी. दुधी भोपळ्याला शक्य असल्यास प्लास्टिकचे वेस्टनमध्ये पॅकिंग करावी म्हणजे फळाचा दर्जा राखला जातो.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★

## संतवाणी



अवघाची संसार सुखाचा करीन|
जरी जाला दुःखाचा दुर्धर हा ||१||
विठोबाचे नाम गाईन मनोभावे|
चित्त तेणे नावे सुख पावे ||२||

या अभंगात संत नामदेव म्हणतात की हा अवघाची संसार म्हणजे हा जो संसार आहे तो सुखाचा करीन म्हणजेच जरी ह्या संसारामध्ये राहत असलो तरी त्या संसारामध्ये सुखापेक्षा दुःख आहे आणि ह्या दुःखाची झळ हे तुझ्या भक्तीशिवाय काहीच नाही. कितीही संसारात दुःख, कष्ट, यातना झाल्या तरी त्यातून बाहेर पडायचे तर तुझ्यामध्ये शक्ती आहे, म्हणून ह्या संसारातून निवृत्ती न घेता त्यात राहून तुझी भक्ती करणे हेच महत्वाचे आहे.